|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**Kavayitri Bahinabai Chaudhari**
**North Maharashtra University, Jalgaon**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**



उमवि नगर, जळगाव-४२५००१ फोन: ०२५७-२२५७२७६, २२५७२७७फॅक्स: ०२५७-२२५८४०३, ४०६.
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : ०२५७-२२५७२७६ to २२५७२७७, Fax Nos.:०२५७-२२५८४०३, ४०६
Web : www.nmu.ac.in E-mail : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

जा.क्र. कबचौउमवि/१८/ 84 /२०२५ **Email** दि. २७/०१/२०२६ 29

प्रति,
मा. प्राचार्य,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव
संलग्नित सर्व संलग्नित महाविद्यालय
जळगाव, धुळे आणि नंदूरबार

विषय - सारथी संस्थेअंतर्गत अधिछात्रवृत्ती घेत असलेल्या व सन २०१९ ते २०२५ कालावधीत तासिका तत्वावर/कंत्राटी म्हणून कार्यरत शिक्षकांची नावे एक्सेल फाईल व हार्ड स्वरुपात पाठविणे बाबत.

संदर्भ - १. मा. व्यवस्थापकीय संचालक (भा.प्र.से.), छत्रपती शाहू महाराज प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे यांचे पत्र जा.क्र. सारथी/संशोधन/अधिछात्रवृत्ती २०२५-२६/१३५२ दि. १९.११.२०२५
२. उपव्यवस्थापकीय संचालक, सारथी विभागीय कार्यालय, नाशिक यांचे पत्र क्र. सारथी/अधिछात्रवृत्ती/२०२५/२०२५/६६६ दि. ९.१२.२०२५
३. विद्यापीठाचे पत्र जा.क्र.उमवि/१८/१६२३/२०२५ दि. २२.१२.२०२५
४. उपव्यवस्थापकीय संचालक, सारथी विभागीय कार्यालय, नाशिक यांचे पत्र क्र. जा.क्र. सारथी / अधिछात्रवृत्ती/विद्यापीठ भेट/२०२६-०४ दि. ०१.०१.२०२६

महादेय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सारथी संस्थेअंतर्गत अधिछात्रवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या ३०७८ विद्यार्थ्यांची यादी आपणास पाठविण्यात येत आहे. यामध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत इतरही विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांची नावे, त्यांचे विषय व मार्गदर्शकाचे नाव देण्यात आले आहे. कबचौउमवि आणि इतर विद्यापीठातील सदर विद्यार्थी तासिका तत्वावर अथवा मानधन तत्वावर नोकरी करत असल्यास किंवा इतर अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्ती घेत असल्यास कृपया सारथी कार्यालयास वरील हार्ड स्वरुपात आणि ईमेल कळविण्यात यावे अशी विनंती उपरोक्त पत्रात करण्यात आली आहे.

१. त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयात सन २०१९ ते २०२५ या कालावधी मध्ये सोबत जोडलेल्या ३०७८ विद्यार्थ्यांपैकी तासिका तत्वावरील / मानधन तत्वावर नोकरी करणाऱ्या शिक्षकांची यादी (Excel Format मध्ये) या सारथी संस्थेस sarathipune@gmail.com या ईमेल वर त्याची एक प्रत dr-approval@nmu.ac.in या ईमेल वर पाठवावेत.

२. आपण माहिती भरत असलेल्या एक्सेल फाईल मधील फॉर्मेट मध्ये / कॉलम मध्ये कुठलाही बदल करु नये.

३. कबचौउमवि, जळगावच्या विद्यार्थ्यांव्यतिरिक्त इतर विद्यापीठातील सारथी योजनेचा लाभ घेत असलेले परंतु आपल्या महाविद्यालयात रुजू झालेल्या शिक्षकांचीही माहिती आपणास पाठवायची आहे. त्यामुळे कुठलीही शहनिशा न करता निरंक माहिती पाठविल्यास / माहिती लपविल्यास आणि तदनंतर शासनाकडून पडताळणी केल्यानंतर आपण पाठविलेल्या माहितीत अपूर्णता आढळल्यास यासंदर्भात होणाऱ्या चौकशीस आपण जबाबदर रहाल, कृपया याची नोंद घ्यावी ही विनंती.

.. २

माहिती दि. ०२/०२/२०२६ पर्यंत हार्ड व सॉफ्ट स्वरुपात माहिती पाठविण्यात यावी. सारथी संस्थेचा पत्ता - उपव्यवस्थापकीय संचालक, सारथी विभागीय कार्यालय, नाशिक ईमेल - sarathipune@gmail.com फोन : ०२०-२५५९२५०२.

आपला विश्वासू

(डॉ. विनोद पाटील)
कुलसचिव

सोबत : १. सारथी संस्थेकडून प्राप्त ३०७८ विद्यार्थ्यांची एक्सेल फाईल

२. उपरोक्त ३०७८ विद्यार्थ्यांमधून महाविद्यालयात सन २०१९-२५ कालावधीत तासिका तत्वावर/कंत्राटी म्हणून कार्यरत शिक्षकांची नावे भरण्यासाठीची एक्सेल फाईल.

प्रत -

मा. श्री. महेश पाटील, (भा प्र. से.) व्यवस्थापकीय संचालक, - छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे सी टी सर्वे नं. १७३, बी/१ गोपाल गणेश आगरकर रोड, शिवाजी नगर, पुणे - ४११ ००४

**तक्ता क्र. १ सारथी संस्थेअंतर्गत अधिछात्रवृत्ती लाभ घेत असलेल्या ३०७८ विद्यार्थ्यांना कबचौउमवि, जळगाव संलग्नित महाविद्यलयात लाभ दिला जात असल्यास अथवा तासिका तत्वावर/मानधन तत्वावर कार्यरत असल्यास अशा विद्यार्थ्यांची/शिक्षकांची माहिती सादर करणे बाबत.**

| अ.क्र. | सारथी संस्थे अंतर्गत लाभ घेत असलेल्या संशोधक विद्यार्थी/विद्यार्थीनीची नावे | सन २०१९ ते २०२५ पर्यंत आपल्या महाविद्यालयाकडून कंत्राटी पद्धतीने किंवा तासिका तत्वावर मान्यता दिली गेली असल्यास त्याची माहिती | | | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | व्याख्याता मान्यता क्रमांक व दिनांक | व्याख्याता मान्यता दिलेला कालावधी | महाविद्यालयाच्या संस्थेचे नाव | महाविद्यालयात रुजू झाल्याचा दिनांक | सध्या कार्यरत/शेवटचा कार्यरत दिनांक | अधिछात्रवृत्ती प्रदान केलेला कालावधी | प्रदान केलेली रक्कम | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

प्राचार्य

नाव, शिक्का , स्वाक्षरी व दिनांक

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व
मानव विकास संस्था (सारथी), पुणे विभागीय कार्यालय, नाशिक
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
पत्ता : बॅरेक नं. ८, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिकरोड, नाशिक - ४२२१०१.
Email : divnashiksarthi@gmail.com
दूरध्वनी क्र. : ०२५३-२९९३६८९

जा. क्र. सारथी/अधिछात्रवृत्ती/विदयापिठ भेट/2026/04 दि. /12/2025 01/01/2026

BY Speed Post

प्रति,
मा. कुलसचिव,
कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर
महाराष्ट्र विदयापीठ, जळगांव.

विषय : सारथी संस्थेअंतर्गत अधिछात्रवृत्ती घेत असलेल्या विदयार्थ्यांबाबत – आवश्यक माहिती सादर करणेबाबत.

संदर्भ : 1) मा. व्यवस्थापकीय संचालक, (भा.प्र.से.) सारथी, मु.का., पुणे यांचे पत्र क्र. सारथी/संशोधन/अधिछात्रवृत्ती/2025-26/1352 दि. 19.11.2025.
2) या कार्यालयाचे पत्र क्र. सारथी/अधिछात्रवृत्ती/2025/666 दि. 09.12.2025.
3) आपले कार्यालयाचे पत्र क्र. कबचौउमवि/18/1623/2025 दि. 27.12.2025.
4) मा. व्यवस्थापकीय संचालक, (भा.प्र.से.) सारथी, मु.का., पुणे यांचे पत्र क्र. सारथी/आस्था/2025-26/1539 दि. 29.12.2025.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय पत्रांचे अवलोकन व्हावे. सारथी संस्थेमार्फत निवड होऊन Phd करणा-या संशोधक विदयार्थ्यांना Date Of Registration पासून एकूण 5 वर्षासाठी अधिछात्रवृत्ती रक्कम देणेत येते. प्रथम दोन वर्ष J.R.F. दराने रु. 37,000/- दरमहा व दोन वर्षानंतर S.R.F. दराने रु. 42,000/- दरमहा अधिछात्रवृत्ती देण्यात येते. सारथी संस्थेच्या मार्गदर्शक तत्वांनूसार, सारथी अंतर्गत अधिछात्रवृत्ती प्राप्त होत असतांना सदर संशोधक विदयार्थ्यांनी पूर्ण वेळ संशोधन काम करणे आवश्यक असून इतरत्र अन्य ठिकाणी कोठेही काम करणे अपेक्षीत नाही (उदा. : कंत्राटी पध्दतीने - Contractual Faculty/तासिका तत्वावर Clock Hour Basis) तसेच सारथी व्यतिरीक्त अन्य कोणत्याही मार्गाने अधिछात्रवृत्ती घेणे अपेक्षीत नाही. सदर बाब आपले कार्यालयास संदर्भीय पत्रांन्वये अवगत करणेत आलेली आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. 1 अन्वये आपले कार्यालयास 3078 विदयार्थ्यांची यादी पाठविणेत आली होती व संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये 38 विदयार्थ्यांची यादी पाठविणेत आली होती.

त्या अनुषंगाने संदर्भीय पत्र क्र. 3 अन्वये आपले कार्यालयाने माहिती सादर केलेली आहे. आपण सादर केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता आपण फक्त आपले विदयापिठा अंतर्गत नोंदणी झालेल्या 65 विदयार्थी विचारात घेऊन माहिती सादर केलेली आहे.

तथापि, संदर्भीय पत्र क्र. संदर्भीय पत्र क्र. 1 अन्वये पाठविणेत आलेले 3078 विदयार्थ्यांची यादी विचारात घेऊन सदर यादितील सर्व विदयार्थ्यांना आपल्या विदयापिठा अंतर्गत कंत्राटी पध्दतीने (Contractual Faculty) किंवा तासिका तत्वावर (Clock Hour Basis) मान्यता देणेत आलेली आहे किंवा कसे, तसेच आपले विदयापिठा अंतर्गत सदर विदयार्थी हे Phd करत असतांना अधिछात्रवृत्ती (fellowship) रकमेचा फायदा घेतात किंवा कसे अशी माहिती सादर करणे अपेक्षीत असल्याबाबतच्या सूचना या संदर्भीय पत्र क्र. 4 अन्वये प्राप्त झालेल्या आहेत. **सोबत संदर्भीय पत्र क्र. 4 ची प्रत व 3078 विदयार्थ्यांची यादी जोडलेली आहे.**

**3078 यादितील विदयार्थ्यांना आपल्या विदयापिठाकडून कंत्राटी पध्दतीने (Contractual Faculty) किंवा तासिका तत्वावर (Clock Hour Basis) मान्यता दिली गेली असल्यास ती कोणत्या कालावधिसाठी, कोणत्या महाविदयालयासाठी दिली गेली आहे ही माहिती सादर करणे आवश्यक आहे तसेच आपले विदयापिठाकडून अधिछात्रवृत्ती (fellowship) प्रदान केली असल्यास ती कोणत्या कालावधिसाठी प्रदान केली आहे व तिची रक्कम ही माहिती सादर करणे देखील आवश्यक आहे. माहिती सादर करावयाचा विहीत तक्ता क्र. 1 नमूना सोबत जोडलेला आहे.**

**सदर माहिती ही शासन स्तरावर मा. अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई व मा. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे यांना सादर करावयाची आहे. नागपूर येथे गत हिवाळी अधिवेशनात Phd करणा-या विदयार्थ्यांना देण्यात येणा-या अधिछात्रवृत्ती विषयावर चर्चा झालेली आहे. सामुळे सदर माहिती कृपया दि. 07.01.2026 पर्यंत सादर करणेत यावी ही विनंती.**

(बी. एं. कापसे)
उप व्यवस्थापकीय संचालक
सारथी विभागीय कार्यालय, नाशिक

प्रत : मा. व्यवस्थापकीय संचालक, (भा.प्र.से.) छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे माहितीस्तव सविनय सादर.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव मान्यता विभाग 06 JAN 2026 आवक क्र.: 51
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon (Pro.V. C. Office) 06 JAN 2026 INWARD No.: 74
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव कुलसचिव कार्यालय 05 JAN 2026

Pr office / FAO / DR, ADMN.
Approval (Exams) / Approval / Research

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व
मानव विकास संस्था (सारथी), पुणे – विभागीय कार्यालय, नाशिक
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
पत्ता : बॅरेक नं. ८, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिकरोड, नाशिक - ४२२१०१.
Email : divnashiksarthi@gmail.com
दूरध्वनी क्र. : ०२५३-२९९३६८९

जा. क्र. सारथी/अधिछात्रवृत्ती/विदयापिठ भेट/2025/ ८८८ दि.२६/12/2025

प्रति,
मा. कुलसचिव,
कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर
महाराष्ट्र विदयापीठ, जळगांव

कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
१८ व्याख्याता मान्यता विभाग
28 JAN 2026
आवक क्र.: 149

**विषय : सारथी संस्थेअंतर्गत अधिछात्रवृत्ती घेत असलेल्या विदयार्थ्यांबाबत – आवश्यक माहिती सादर करणेबाबत.**

संदर्भ : 1) मा. व्यवस्थापकीय संचालक, सारथी, मु.का., पुणे यांचे पत्र क्र. सारथी/संशोधन/अधिछात्रवृत्ती/2025-26/1352 दि. 19.11.2025.
2) मा. व्यवस्थापकीय संचालक, सारथी, मु.का., पुणे यांचे पत्र क्र. सारथी/संशोधन विभाग/वि.का.प./2025-26/1398 दि. 28.11.2025.
3) या कार्यालयाचे पत्र क्र. सारथी/अधिछात्रवृत्ती/2025/666 दि. 09.12.2025.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भीय पत्रांचे अवलोकन व्हावे.

सारथी संस्थेमार्फत निवड होऊन Phd करणा-या संशोधक विदयार्थ्यांना Date Of Registration पासून एकूण 5 वर्षांसाठी अधिछात्रवृत्ती रक्कम देणेत येते. प्रथम दोन वर्ष J.R.F. दराने रु. 37,000/- दरमहा व दोन वर्षानंतर S.R.F. दराने रु. 42,000/- दरमहा अधिछात्रवृत्ती देण्यात येते. सारथी संस्थेच्या मार्गदर्शक तत्वांनूसार, सारथी अंतर्गत अधिछात्रवृत्ती प्राप्त होत असतांना सदर संशोधक विदयार्थ्यांनी पूर्ण वेळ संशोधन काम करणे आवश्यक असून इतरत्र अन्य ठिकाणी कोठेही काम करणे अपेक्षीत नाही व सारथी व्यतिरीक्त अन्य कोणत्याही मार्गाने अधिछात्रवृत्ती घेणे अपेक्षीत नाही.

सदर बाब आपले कार्यालयास संदर्भीय पत्रांन्वये अवगत करणेत आलेली आहे. तसेच सारथी संस्थेमार्फत अधिछात्रवृत्ती घेत असलेल्या विदयार्थ्यांची नांवे व आवश्यक माहिती ही देखील आपले कार्यालयास पुरविणेत आलेली आहे. या अनुषंगाने या कार्यालयातील श्री सुनिल सु. दंडगव्हाळ, संशोधन अधिकारी यांनी दि. 16.12.2025 रोजी आपले विदयापिठास प्रत्यक्ष भेट देऊन श्री एस. टी. इंगळे, प्रभारी कुलगुरु, श्री प्रविण चंदनकर, कक्ष अधिकारी (संशोधन विभाग), श्रीमती जयश्री शिनगारे, कक्ष अधिकारी, डॉ. सोमनाथ वडनेरे (व्याख्याता मान्यता विभाग) यांचेशी प्रत्यक्ष चर्चा केली.

सदर संशोधक विदयार्थी सारथी अधिछात्रवृत्ती व्यतिरीक्त अन्य मार्गाने देखील आर्थिक लाभ घेतात किंवा कसे याबाबतची माहिती आपले कार्यालयाकडून सादर करणे अपेक्षीत होते. तथापि, सदर माहिती ही अदयापपावेतो अप्राप्त आहे. **सदर माहिती ही मा. अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई व मा. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे यांना सादर करावयाची असल्याने आवश्यक ती त्वरीत सादर करणेत यावी ही विनंती.**

(बी. ए. काप्रसे)
उप व्यवस्थापकीय संचालक
सारथी विभागीय कार्यालय, नाशिक.

PVC office / FAO
Shri. SGV.
28/01/2026

प्रत : मा. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणे

Approval

कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
कुलसचिव कार्यालय
27 JAN 2026
512

Kavayitri Bahinabai Chaudhari
North Maharashtra University,
Jalgaon (Pro.V. C. Office)
27 JAN 2026
INWARD No. : 501